**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संजय गोपाळ तांदळवाडे
मु.पो.आरग, ता.मिरज,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती मिरज,
ता.मिरज, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
पंचायत समिती मिरज,
ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८६/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/०५/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १/०७/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००६-२००७ मध्ये राजीव गांधी ग्रामीण घरकुल योजनेअंतर्गत किती घरकुले मंजूर करण्यात आली | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.११/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता.

सदर अपिलासोबतची कागदपत्रे पाहता अपीलकर्ता श्री. संजय गोपाळ तांदळवाडे यांना आवश्यक ती माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेली असल्याबाबतचा अहवाल गटविकास

अधिकारी, पंचायत समिती, मिरज यांनी दि. १९/११/२००८ रोजी आयोगास सादर केला आहे. अपीलकर्ता श्री.तांदळवाडे यांना देऊ केलेली माहिती त्यांनी स्वीकारलेली नाही. माहिती नेण्यास येतो, असे सांगून ते आले नाहीत, असा लेखी जबाब श्रीमती एस.एस.दसरे, कनिष्ठ लिपिक यांनी दिला आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संजय गोपाळ तांदळवाडे
मु.पो.आरग, ता.मिरज,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती मिरज,
ता.मिरज, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
पंचायत समिती मिरज,
ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८७/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/५/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १/७/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००६-२००७ मधील राजीव गांधी घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची मंजूर यादी दारिद्रय रेषेखाली यांदीतील क्र.१२७ मधील लाभार्थ्यास घरकुल मंजूर आहे काय, व त्या लाभार्थ्यांची कागदपत्रे | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.११/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता.

अपीलकर्ता श्री. संजय गोपाळ तांदळवाडे यांना हवी असलेली माहिती-मागणी विषयी स्पष्टता झाल्यानंतर १० दिवसांत देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती मिरज, जि.सांगली यांनी प्रपत्रात नमूद केले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता श्री.तांदळवाडे यांना रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविण्यात आल्याबाबतचा अहवाल गटविकास अधिकारी, पंचायत समिती मिरज यांनी दि.१९/११/२००८ रोजी आयोगास सादर केला. माहिती नेण्यास येतो, असे सांगून श्री.तांदळवाडे आले नाहीत, असा लेखी जबाब श्रीमती एस.एस.दसरे, कनिष्ठ लिपिक यांनी दिला आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. श्रीरंग नामदेव खाडे
मु.पो.केत्तूर नं.२, ता.करमाळा,जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत केत्तूर
ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. श्रीरंग नामदेव खाडे
मु.पो.केत्तूर नं.२, ता.करमाळा,जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर
तर्फे प्रतिनिधी श्री.ए.बी. भूजबळ

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत केत्तूर
ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.एम. एम.सरडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ८.१०.२००८रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. ११.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

ग्रामपंचायतीच्या जमाखर्चाच्या संदर्भातील व अन्य माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत केत्तूर यांनी सहा महिने विलंबाने व अपूर्ण दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. श्रीरंग नामदेव खाडे यांनी केली.

अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची होती. ग्रामपंचायतीकडील निधीअभावी माहिती देता आली नव्हती. कळविलेले शुल्क त्यांनी स्टेट बँकेत भरले. गट विकास अधिकारी कार्यालयाशी वारंवार पत्रव्यवहार करूनही अद्यापही रक्कम ग्रामपंचायतीकडे आलेली नाही. आपण स्वखर्चाने माहिती दिली. तसेच ७०७ प्रती अवांतर दिल्याची अपीलकर्त्याची तक्रार होती व रक्कम परत मिळावी अशी त्यांची मागणी होती. ही रक्कमही आपण परत दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत केत्तूर श्री. एम.एम.सरडे यांनी संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रतींसह केले. अपीलकर्त्यास वेळोवेळी माहिती देण्यात आली असून तशी पोहच दिल्याची प्रतही जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. एम.एम. सरडे यांनी सादर केली.

ग्रामपंचायतीकडे निधी उपलब्ध नसताना वारंवार पत्रव्यवहार केल्यानंतरही गट विकास अधिकारी कार्यालयाने संबंधित रक्कम ग्रामपंचायतीकडे वर्ग न करणे योग्य नाही. याबाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण तुळशीराम कांचन
स्नेहल ज्योती, महादेवनगर, मु.पो.उरूळीकांचन, ता.हवेली, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे
यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक,
भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण तुळशीराम कांचन
स्नेहल ज्योती, महादेवनगर, मु.पो.उरूळीकांचन, ता.हवेली, जि.पुणे

**जन माहित्ती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक, भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे
यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पुणे श्री.सी.एस.शिंगाडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.१०.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.७.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.५.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण तुळशीराम कांचन
स्नेहल ज्योती, महादेवनगर, मु.पो.उरूळीकांचन, ता.हवेली, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे
यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक,
भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण तुळशीराम कांचन
स्नेहल ज्योती, महादेवनगर, मु.पो.उरूळीकांचन, ता.हवेली, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक, भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे
यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पुणे श्री.सी.एस.शिंगाडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.१०.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.७.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.५.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९६६-१९६८ मध्ये राबविलेल्या जमीन एकत्रीकरण योजनेत गटवारी अधिकाऱ्यांनी मूळ मिळकतीच्या क्षेत्रात नियमबाह्य पध्दतीने बदल केला आहे. कागदोपत्री बदल केला असून गटवारी अधिकाऱ्याने प्रत्यक्षात बदल केलेले नाहीत. त्यामुळे क्षेत्र दुरूस्ती करून-म्हणजे पूर्ववत नोंदी ठेवण्याची मागणी अमान्य केली असून नियमबाह्य कृतीमुळे मागितलेली माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.नारायण तुळशीराम कांचन यांनी केली.

श्री.कांचन यांनी प्रश्नार्थक स्वरूपाची विचारणा केली असल्यामुळे माहिती देता येणार नाही, असे कळविले. क्षेत्र दुरूस्ती करण्याची कार्यवाही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही. तसेच काही गृहितावर आधारित खुलाशाची विचारणा त्यांनी केली आहे. तशी माहिती देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये शक्य नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक, भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय, पुणे श्री.सी.एस.शिंगाडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

क्षेत्रदुरूस्तीची अपीलकर्त्याची मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच त्यांच्या अर्जातील दोनही मुद्दे त्या अनुषंगाने भाष्यवजा खुलासा मागणारे आहेत. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कि.बा.उर्फे आण्णा हजारे
हिंद स्वराज्य ट्रस्ट कार्यालय,
बी.एम.सी.सी. रोड,
पुणे-४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड रिचर्स,
सर्व्हे नं.४०/४ ए +४बी/१,
पुणे म.न.पा जकात नाक्याजवळ, कोंढवा सासवड रोड,
कोंढवा बुद्रुक, पुणे-४८

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१३/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२/२/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षामधील एम.बी.ए. प्रथम वर्षाच्या प्रवेशपध्दती बद्दलची माहिती | |

**विवेचन**

विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. सिंहगड इन्स्टिटयूट टेक्नीकल एज्युकेशन सोसायटी ही संस्था कायमस्वरुपी विना अनुदानित असून या संस्थेला कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य तसेच कोणत्याही प्रकारचा निधी मिळत नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) मध्ये

नमूद केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या संज्ञेमध्ये या संस्थेचा समावेश होत नाही त्यामुळे या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नाही, असे संचालक, सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लीकेशन यांनी दि. ४/०८/२००९ व १०/०८/२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा उपरोक्त न्याय निर्णय व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कि.बा.उर्फ आण्णा हजारे
हिंद स्वराज्य ट्रस्ट कार्यालय,
बी.एम.सी.सी. रोड,
पुणे-४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
आलाना इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स,
आझम कॅम्पस, २३९०, के.बी. हिदायतुल्ला रोड,
पुणे-१

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१४/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५/०२/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षामधील एम.बी.ए. प्रथम वर्षाच्या प्रवेश पध्दती बद्दलची माहिती | |

## विवेचन

विना अनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. आलाना इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स, ही संस्था कायमस्वरुपी विना अनुदानित असून या संस्थेला कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य तसेच कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) मध्ये नमूद केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण'या संज्ञेमध्ये या संस्थेचा समावेश होत नाही त्यामुळे या संस्थेस माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ लागू नाही,असे प्रथम अपिलीय प्राधिकारी आलाना इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स, पुणे यांनी आयोगास कळविले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा उपरोक्त न्याय निर्णय व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
दि :- 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कि.बा.उर्फ आण्णा हजारे
हिंद स्वराज्य ट्रस्ट कार्यालय,
बी.एम.सी.सी.रोड,
पुणे-४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लीकेशन,
न-हे आंबेगाव उड्डाणपुलाजवळ,
पुणे-४१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१५/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४/०२/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षामधील एम.बी.ए. प्रथम वर्षाच्या प्रवेश पध्दती बद्दलची माहिती | |

## विवेचन

विना अनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, ही संस्था कायमस्वरुपी विना अनुदानित असून या संस्थेला कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य तसेच कोणत्याही

प्रकारचे अनुदान मिळत नाही,त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) मध्ये नमूद केलेल्या'सार्वजनिक प्राधिकरण'या संज्ञेमध्ये या संस्थेचा समावेश होत नाही त्यामुळे या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नाही, असे संचालक, सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लीकेशन यांनी दि.१७/१२/२००७ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा उपरोक्त न्याय निर्णय व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कि.बा.उर्फ आण्णा हजारे
मु.पो.राळेगणसिध्दी, ता.पारनेर, **अपीलकर्ता**
जि.अहमदनगर,

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,** **उत्तरवादी**
डॉ. डी.वाय.पाटील मेडीकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल,
पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१६/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/०३/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षामधील एम.बी.बी.एस. प्रवेशाबद्दलची माहिती | |

## विवेचन

विना अनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. डॉ. डी.वाय.पाटील मेडीकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल ही संस्था खाजगी विनाअनुदानित असल्याचे जनसंपर्क अधिकारी यांनी त्यांच्या आयोगासोबतच्या पत्रव्यवहारामध्ये नमूद केलेले आहे. तसेच अपीलकर्ते श्री.हजारे यांना दि. २७/०२/२००७ च्या पत्रान्वये माहिती पाठविण्यात आली असल्याचे देखील जन माहिती अधिकारी, डॉ. डी.वाय.पाटील मेडीकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, पिंपरी, पुणे यांनी आयोगास दि.१/०८/२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्या अनुषंगाने संस्थेकडून प्राप्त

झालेली माहिती ही आपल्या मागणीप्रमाणे परिपूर्ण आहे किंवा कसे, तसेच प्राप्त माहितीने आपले समाधान झाले असल्यास आपले आयोगाकडील अपील निकाली काढावे किंवा कसे? याबाबत आयोगास अवगत करण्याची विनंती दि.२२/११/२००९ च्या पत्रान्वये व दि. २५/०१/२०१० च्या स्मरणपत्रान्वये श्री. हजारे यांना करण्यात आली होती. तथापि त्यास श्री. हजारे यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा उपरोक्त न्याय निर्णय व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ. *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कि.बा.उर्फ आण्णा हजारे
मु.पो.राळेगणसिध्दी, ता.पारनेर, **अपीलकर्ता**
जि.अहमदनगर,

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
विश्वकर्मा इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी,
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी,
पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१७/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २/०३/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शैक्षणिक वर्ष २००६-०७ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, (आयटी) व कॉम्प्युटर इंजिनिअरिंग या शाखांतील प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेबद्दलची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ते श्री. आण्णा हजारे यांना दि. ३१/१२/२००६ च्या पत्रान्वये माहिती पाठविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य विश्वकर्मा इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, बिबवेवाडी, पुणे-३७ यांनी दि.३१/१२/२००७ च्या पत्रान्वये पूरक कागदपत्रांसह आयोगास कळविले. त्या अनुषंगाने

संस्थेकडून प्राप्त झालेली माहिती ही आपल्यामागणी प्रमाणे परिपूर्ण आहे किंवा कसे, तसेच प्राप्त माहितीने आपले समाधान झाले असल्यास आपले आयोगाकडील अपील निकाली काढावे किंवा कसे, याबाबत आयोगास अवगत करण्याबाबत दि.१/०७/२००९ च्या पत्रान्वये व दि. २५/०१/२०१० च्या स्मरणपत्रान्वये श्री. हजारे यांना आयोगाने कळविले होते. तथापि श्री. हजारे यांच्याकडून कोणतेही उत्तर आलेले नाही.

दरम्यान, विना अनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा उपरोक्त न्यायनिर्णय व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कि.बा.उर्फ आण्णा हजारे
मु.पो.राळेगणसिध्दी, ता.पारनेर,
जि.अहमदनगर,

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीज
श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग
सर्व्हे नं. ४४/१, वडगांव बुद्रुक,
पुणे-४१

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१८/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/०२/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शैक्षणिक वर्ष २००६-०७ मध्ये इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी व बी. ई. कॉम्प्युटर या शाखांतील प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेबद्दलची स्वतंत्रपणे माहिती | |

**<u>विवेचन</u>**

विना अनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ही संस्था कायमस्वरुपी विना अनुदानित असून या संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य अथवा कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २

(ज) मध्ये नमूद केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' संज्ञेमध्ये या संस्थेचा समावेश होत नाही. त्यामुळे या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असे प्राचार्य, श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, वडगांव बुद्रुक, पुणे -४१ यांनी आयोगास कळविले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा उपरोक्त न्याय निर्णय व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कि.बा.उर्फ आण्णा हजारे
हिंद स्वराज्य ट्रस्ट कार्यालय,
बी.एम.सी.सी. रोड,
पुणे-४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
सिंहगड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटीज
सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,
सर्व्हे नं.४४/१, वडगांव बुद्रुक,
सिंहगड रोड, पुणे-४१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/०२/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शैक्षणिक वर्ष २००६-०७ मधील बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग इन कॉम्प्युटर व बॅचलर ऑफ इन इन्फरमेशन टेक्नॉलॉजी या शाखातील प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेबद्दलची स्वतंत्रपणे माहिती | |

## विवेचन

विना अनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ही संस्था कायमस्वरुपी विना अनुदानित असून या संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य,कोणत्याही प्रकारचे

अनुदान मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) मध्ये नमूद केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या संज्ञेमध्ये या संस्थेचा समावेश होत नाही. त्यामुळे या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असे प्राचार्य, सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग वडगांव बुद्रुक, पुणे-४१ यांनी आयोगास कळविले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा उपरोक्त न्याय निर्णय व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कि.बा.उर्फआण्णा हजारे
हिंद स्वराज्य ट्रस्ट कार्यालय,
बी.एम.सी.सी.रोड,
पुणे-४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
सिंहगड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटीज
सिंहगड कॉलेज ऑफ आर्किचर,
सर्व्हे नं.४४/१, वडगांव बुद्रुक,
सिंहगड रोड, पुणे-४१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४/०२/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शैक्षणिक वर्ष २००६-०७ मध्ये बी.आर्च या शाखेतील प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेबद्दलची स्वतंत्रपणे माहिती | |

## विवेचन

विना अनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेचर ही संस्था कायमस्वरुपी विना अनुदानित असून या संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य, तसेच कोणत्याही प्रकारचे

अनुदान मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) मध्ये नमूद केलेल्या ‘सार्वजनिक प्राधिकरण’ या संज्ञेमध्ये या संस्थेचा समावेश होत नाही. त्यामुळे या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असे प्राचार्य, सिंहगड कॉलेज ऑफ आर्कीटेक्चर यांनी आयोगास कळविले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा उपरोक्त न्याय निर्णय व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जितेंद्र महादेव व्हनकडे
चर्चजवळ, कुपवाड, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथाउपमुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुख्यालय, मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक
विकास महामंडळ, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३१ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुख्यालय, मुंबई श्री.पी.एस.कवठेकर

**जन माहिती अधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक
विकास महामंडळ, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली श्री.बी.एम.मेटकरी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.४.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.९.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

प्रकल्पग्रस्त योजनेअंतर्गत नोकरी मिळण्याच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती जाणीवपूर्वक विलंबाने व अपुरी देणारे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.जितेंद्र महादेव व्हनकडे यांनी लेखी निवेदनात केली.

श्री.व्हनकडे यानी मागितलेली माहिती कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली विभाग व प्रादेशिक विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली यांनी मुद्देनिहाय दिली. संबंधित कागदपत्रांच्या प्रतीही देण्यात आल्या. अपीलकर्त्यास प्रकल्पग्रस्त म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सेवेत नोकरी मिळणे-न मिळणे हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुख्यालय, मुंबई श्री.पी.एस.कवठेकर यांनी केले. दिलेली माहिती, प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या सूचना आदी कागदपत्रांच्या प्रती त्यांनी सादर केल्या. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

2 4 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दिलीपराव सखाराम माने
द्वारा माने अँड माने ॲटोमोबाईल,
एस.टी.स्टँड समोर, इस्लामपूर
ता. वाळवा, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली
जिल्हा परिषद, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
सांगली, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३४ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १५.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. दिलीपराव सखाराम माने
द्वारा माने अँड माने ॲटोमोबाईल,
एस.टी.स्टँड समोर, इस्लामपूर
ता. वाळवा, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली
जिल्हा परिषद, सांगली श्रीमती अश्विनी मुदगल

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
सांगली, जि. सांगली डॉ. ए. पी. वाघमारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमात या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १५.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती ६९ दिवस विलंबाने दिली. त्यांच्या कारकिर्दीतील अधिकारी / कर्मचारी यांचे जबाब घेऊन देण्याची मागणी आपण केली होती. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश देऊनही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दिलीपराव सखाराम माने यांनी केली.

अनेक कर्मचाऱ्यांचे जबाब घेऊन माहिती द्यावी, सेवापुस्तकातील नोंदी बदलल्या आहेत, त्याबाबतची माहिती द्यावी, अशा स्वरूपाची मागणी श्री. माने यांनी केली होती. अशी मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अन्य माहिती तालुका स्तरावरून प्राथमिक आरोग्य केंद्राकडून मागवून घेऊन संकलित करुन दिली, त्यामुळे उत्तर देण्यास २१ दिवस विलंब झाला. आणखी काही माहिती अपीलकर्त्यास देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली डॉ. ए.पी. वाघमारे यांनी दिले. त्यानुसार पूर्तता केली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, सांगली डॉ. ए. पी. वाघमारे यांनी केले. तालुका स्तरावरुन माहिती मागविणे व प्रशासकीय कार्यवाहीच्या अनुषंगाने अभिलेख तपासणी, यामुळे झालेला विलंब क्षमापित करावा, अशी विनंती डॉ. वाघमारे यांनी केली. उभय बाजूंनी सादर करण्यात आलेली कागदपत्रे व निवेदने पाहता ती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे

दि. 26 MAY 2010

(राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानदेव लक्ष्मण मोरे
तर्डे कॉलनी, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे-२ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे-२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४/ २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.ज्ञानदेव लक्ष्मण मोरे
तर्डे कॉलनी, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे-२ श्री.व्ही.पी.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे-२ श्री.जे.एच.निंबाळकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.११.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.१२.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्री.पिसे, तलाठी, कात्रज, श्री.आर.ए.शेख, मंडल अधिकारी, हडपसर, श्री.विजयसिंह पाटील, तहसीलदार, हवेली व श्री.शंकरराव जाधव, तत्कालीन उपविभागीय अधिकारी, हवेली यांच्या संदर्भातील मालमत्ता व दायित्त्व विवरणपत्राची प्रत, तसेच तलाठी व मंडल अधिकारी यांनी गेल्या तीन वर्षात घोषणापत्राद्वारे केलेल्या फेरफार नोंदीची यादी आपण तलाठी, तहसीलदार, हवेली, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त कार्यालय या सर्वांकडे मागितली. त्या त्या ठिकाणच्या जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपीलही केले. परंतु माहिती मिळाली नाही. आपल्या जमीनीच्या संदर्भातील नोंदी तलाठी व मंडल अधिकारी आदींनी संगनमताने रद्द केल्या. उच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश असूनही तो डावलून नोंदीत बदल केला, असे उपविभागीय अधिकाऱ्यांनी निकालपत्रात म्हटले आहे. त्या अनुषंगाने तलाठी श्री.पिसे व मंडल अधिकारी श्री.शेख यांच्यावर केलेल्या कारवाईची माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.ज्ञानदेव लक्ष्मण मोरे यांनी केली.

मागील तीन वर्षांमधील नोंदीची माहिती श्री.मोरे यांनी मागितली असून माहिती विस्तृत असल्यामुळे त्यांनी अभिलेखाचे अवलोकन करावे व आवश्यक असलेल्या प्रतींची मागणी करावी. त्यानुसार प्रती देऊ, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे-२ श्री.जे.एच.निंबाळकर यांनी केले. अपीलकर्ता यांनी संबंधित अभिलेखाचे अवलोकन करावे व त्यांना हव्या असलेल्या त्यातील कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे-२ यांनी नि:शुल्क पुरवाव्यात. तसेच शासकीय कर्मचारी सार्वजनिक सेवक असून त्यांच्या मालमत्ता व दायित्त्व विवरणपत्राची प्रत गोपनीय मानता येणार नाही, तीही नि:शुल्क पुरवावी. ही

कार्यवाही दहा दिवसात पूर्ण करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार आपण तहसील कार्यालयात गेल्यानंतर फक्त मुद्दा क्र.१ व २ नुसार घोषणापत्राद्वारे केलेल्या फेरफाराची माहिती मिळाली. मुद्दा क्र.३ व ४ ची माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मोरे यांनी आयोगाकडे केली ती दि.२०.४.२०१० रोजी प्राप्त झाली.

आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ऊर्वरित माहितीची पूर्तता करून जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे-२ यांनी दि.३१.५.२०१० रोजी आयोगाला सादर केला आहे. त्यामध्ये अपीलकर्ता यांनी माहिती मिळालेली असल्याने अपील निकाली काढण्याची विनंती केलेली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ



पुणे
28 MAY 2010